# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०१/०८/२०२६ (शनिवार )**

.......................................................................................................................

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०६ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. २ लाख ९८ हजार ५४५ रूपयाचा मुद्देमाल जप्त

**पोलीस स्टेशन भिवापूर** :— दिनांक ०१/०८/२०२६ रोजी भिवापूर पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, स्मशानभुमी ,भिवापुर येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी धाड टाकली असता स्मशानभुमी भिवापुर येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) खुशाल कवडुजी जांभुळे, वय ५१ वर्ष, रा आझाद चौक, भिवापुर २) किशोर प्रल्हाद पिंपळकर , वय ३२ वर्ष, रा. गुरूदेव वार्ड, भिवापुर ३) सचिन सुरेश दिघोरे, वय २९ वर्ष, घुबडटोली ,ता भिवापुर ४) अजय बिसन वाघमारे , वय ३८ वर्ष, रा पारवे पेट्रोलपंपच्या पाठीमागे, भिवापुर ५) कलदार प्रल्हाद गाडगे, वय ५० वर्ष, रा. सिध्दार्थ नगर, भिवापुर ६) धनराज गोपळराव नागपुर , वय ५४ वर्ष, रा. गुरूदेव वार्ड, भिवापुर, जि. नागपुर यांना ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना जागीच पकडले. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते आणि रोख रक्कम ४५४५/—रूपये, ०६ मोबाईल किंमती ७९,०००/—रूपये, ०४ दुचाकी वाहने किमंती २,१५,०००/— रूपये असा एकुण २,९८,५४५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

**नमुद ०६ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन भिवापूर येथे महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**



# पोलीस स्टेशन जलालखेडा अंतर्गत मौजा बानोरचंद्र शेतशिवारात अवैध दारू निर्मिती व विक्री करणाऱ्यांवर ०३ गुन्हे नोंद ६६ हजार ७०० रूपयांचा मुद्देमाल जप्त

**पोलीस स्टेशन जलालखेडा** :— दिनांक ०१/०८/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. पराग पोटे, उपविभागीय पोलीस अधिकारी, काटोल यांच्या नेतृत्वात सहायक पोलीस निरीक्षक श्री. पवन भांबुरकर प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन जलालखेडा यांच्यासह जलालखेडा पोलीस यांनी पोलीस स्टेशन जलालखेडा अंतर्गत मौजा बानोरचंद्र, ता. नरखेड शेतशिवारात व परिसरात विशेष मोहीम राबवून अवैध दारू निर्मिती व विक्री करणाऱ्यांविरुद्ध कारवाई केली आहे.

**सदर कारवाईत जलालखेडा पोलीसांनी अवैध दारू निर्मिती आणि विक्री करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करून आरोपी क्रं १) बलवंतसिंग लडड्डीसिंग बावरी, २) विजयसिंग जतनसिंग भेंड आणि ०१ महिला आरोपीं तिघे रा. बानोरचंद्र, ता. नरखेड यांचेवर कारवाईत करत हातभट्टया नष्ट केल्या तसेच महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये एकुण ०३ गुन्हे नोंद केले आहेत. सदर कारवाई एकुण १०५ लिटर मोहाफुल दारु किंमती १०५००/— रुपये, व**

१००० लिटर मोहाफुल सडवा किंमती ५०,०००/— रुपये व देशी दारूच्या एकुन ३० निपा प्रत्येकी ९० मिलीच्या किंमती १२००/— रुपये व पाच खाली लोंखडी ड्रम प्रत्येकी १०००/—रू प्रमाणे ५,०००/—रू असा एकुण ६६,७००/—रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.







# अरोली पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध दारू आणि जुगार व्यवसायातील सराईत गुन्हेगारास नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

पोलीस स्टेशन अरोली हदद्दीतील अवैध दारू आणि जुगार व्यवसायातील सक्रिय आणि सराईत **आरोपी युवराज दौलत किरपान, वय ४५ वर्ष, रा. अरोली, ता. मौदा** यास महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले.

सराईत गुन्हेगार नामे आरोपी **युवराज दौलत किरपान, वय ४५ वर्ष, रा. अरोली, ता. मौदा याचेवर अवैध दारू बाबत आणि अवैध जुगाराबाबत अनेक गुन्हे नोंद आहे**. नमुद आरोपीचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्यांचे वर कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपीच्या गुन्हेगारी कृत्यामुळे परीसरातील अनेकांना दारूचे व्यसन जडले आहे. तसेच आरोपीचे कृत्य समाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत आहे. आरोपीच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे नमुद आरोपींचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव अरोली पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, मौदा यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद आरोपी **युवराज दौलत किरपान, वय ४५ वर्ष, रा. अरोली, ता. मौदा यास ०३ महीन्यांकरीता नागपुर ग्रामीण आणि जिल्हयातुन हद्दपार केले आहे.**

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी युवराज दौलत किरपान, वय ४५ वर्ष, रा. अरोली, ता. मौदा हा नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**




**हद्दपार आरोपी युवराज दौलत किरपान**

## नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार चालवणाऱ्यावर १० गुन्हे नोंद.

दिनांक ३१/०७/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन यांनी अवैधरित्या ५२ ताशपत्ते तसेच सट्टापट्टी जुगार खेळणाऱ्या/खेळविणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन ५२ ताशपत्ते, सट्टापट्टी साहित्य व रोख रक्कम असा एकुण ४०४५/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण १० गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे प्रितम बिलोदसिंग बमनावत, वय ४१ वर्ष, रा. बेलोना हा अवैधरीत्या सट्टापट्टी जुगार खेळताना मिळुन आला. **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथेआरोपी नामे १) किशोर सूधाकर सातपूते, वय ३८ वर्ष, रा. मेंढला, ता. नरखेड, जि. नागपूर २) प्रमोद शंकरराव तूमसरे, वय ४३ वर्ष, रा. खरबडी, ता. नरखेड, जि. नागपूर हे अवैधरीत्या सट्टापट्टी जुगार खेळताना मिळुन आले.**पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे आरोपी नामे संजय शेषराव नेहारे, वय ४८ वर्ष, रा. वार्ड क्र. ०२, बाजारगावहा अवैधरीत्या सट्टापट्टी जुगार

खेळताना मिळुन आला. **पोलीस स्टेशन बेला** येथे आरोपी नामे नंदकिशोर किसनजी मांगरूळकर, वय ४८ वर्ष, रा. सिर्सी, ता. उमरेड, ता.जि. नागपुर हा अवैधरीत्या सट्टापट्टी जुगार खेळताना मिळुन आला.**पोलीस स्टेशन अरोली** येथे आरोपी नामे **१)** राजेंद्र रामसिंग देंवतरे, वय ५१ वर्ष, रा. खात, ता. मौदा, जि. नागपुर हा अवैधरीत्या सट्टापट्टी जुगार खेळताना मिळुन आला. आरोपी २) आकाश तुलाराम मारबते, वय ३० वर्ष, रा. निमखेडा, ता. मौदा २)शुध्दोधन रामचंद्र पाटील, वय ४५ वर्ष, रा. हिंगणा, ता. मौदा ३) अनुप वासुदेवराव वासनिक, वय ६० वर्ष, रा. निमखेडा, ता. मौदा हे अवैधरीत्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळताना मिळुन आले. **पोलीस स्टेशन देवलापार** येथे आरोपी नामे १) धर्मेंद्र रामू पिल्लारे, वय ३८ वर्ष, २) राजू भगवान ताकोद, वय ४४ वर्ष, ३) अजय श्रीराम पिल्लारे, वय ३१ वर्ष, सर्व रा. पवनी, ता. रामटेक हे अवैधरीत्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळताना मिळुन आले. **पोलीस स्टेशन उमरेड** येथे आरोपी नामेराजु मधुकर कासार, वय ५७ वर्ष, रा. उदासा हे अवैधरीत्या सट्टापट्टी जुगार खेळताना मिळुन आला.**पोलीस स्टेशन कन्हान** येथेआरोपी नामे सुभाष दशरथ कोटांगले, वय ४० वर्षे, रा. आनंद नगर कन्हान, ता. पारशिवनी हे अवैधरीत्या सट्टापट्टी जुगार खेळताना मिळुन आला.

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०२ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद

दिनांक ३१/०७/२०२६ रोजी नागपूर ग्रामीण जिल्हयात विशेष मोहिम राबवुन अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०२ आरोपीतांवर कलम २७ एन. डी. पी. एस कायदयान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन सावनेर** अंतर्गत आरोपी फकिरचंद भिकम शेख, वय ५१ वर्ष, रा. बोरगाव फाटा, ता. कळमेश्वर, जि. नागपुरहा बोरगाव फाटा येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.**पोलीस स्टेशन बोरी** अंतर्गत आरोपी नामे कृष्णानंद रंजीत राय, वय ५३ वर्ष, रा.सुरवत, पोस्ट पाली मोहम्मदाबाद गाजीपुर, उत्तरप्रदेश, ह. मु. भारकस एम आय डी सी बुट्टीबोरी तालुका हिंगणा, जिल्हा नागपुरहा मौजा बुट्टीबोरी एमआयडीसी रोड बीएसएनएल ऑफीस समोरील खुल्या मोकळया जागेतील सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०४ गुन्हे नोंद

दिनांक ३१/०७/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू, देशी दारूअसा एकुण १९८०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०४ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे प्रकाश छोटुसिंग मेंडोले, वय ३३ वर्ष, रा. बेलोना हेटी ता. नरखेड याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे आरोपी नामे १) किसन धनसींग देवगडे, वय ५८ वर्ष, रा. सालईधाबा, ता. हिंगणा, जि. नागपुर२) गणेश जगलुजी कठौते, वय २६ वर्ष, रा. वार्ड क्र. २, हनुमान मंदीर टाकळघाट यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद,**पोलीस स्टेशन उमरेड** आरोपी घनश्याम वासुदेव खडगी, वय ६० वर्ष, रा.ईतवारीपेठयाचेवर१ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण २८८० मिली देशी दारू, ०७ लिटर मोहाफुल दारू असा एकुण १९८०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७४८ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ०१/०८/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील २३ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७४८ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४७ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे १९ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २८ आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव १२ आरोपी अशा एकुण १३४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ६८ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे १५ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी, पोलीस स्टेशन मोहपा येथे १६ आरोपी अशा एकुण १६१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २१ आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १८ आरोपी अशा एकुण ७१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३३ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २४ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २८ आरोपी अशा एकुण ११६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ५८ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ५३ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३२ आरोपी अशा एकुण १७१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.








पोलीस स्टेशन पारशिवनी
RR KABEL
WIRES & CABLES
SWITCHES
SWITCHGEARS




मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने